**<u>रे. दि. मु. ४५५/२०२१</u>**

दिनकर गणपती मोहिते वि. सचिन हैबती मोहिते व इतर

**<u>रे. दि. मु.  ४५५/२०२१ मधील नि.४२ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज, वादीचे वारसाने विलंब माफीकरीता दाखल  केला आहे.

२. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वडीलांचा म्हणजेच वादीचा वार्धक्याने दि. ३१.०५.२०२३ रोजी निधन झाले आहे. त्यांना एकच मुलगा असुन तो मुंबई येथे पोलीस खात्यात नोकरीस असल्याने वकीलांशी संपर्क साधता आला नाही त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यास १३९ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर विलंब क्षमापित होणे गरजेचे आहे अन्यथा त्यांचे कशातही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब विलंब माफ करावा अशी विनंती केलली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन २४० दिवसांचा विलंब झाला असल्याचे व विलंबास कायदेशीर कारण नसुन अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. मयत वादी दिनकर मोहिते यांनी सदरचा दावा वाटप व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला होता. वादीच्या वारसाने वादीचे मृत्युपत्र**(नि. ४९/२)** दाखल केले असुन दि. ३१.०५.२०२३ रोजी वादीचा मृत्यु झाल्याचे दिसुन येत आहे. त्यानंतर ९० दिवसात वारस अभिलेखावर घेणे अपेक्षित होते परंतु अर्ज दाखल करण्यास साधारणतः १५० दिवसांचे विलंब झाल्याचे दिसुन येते. अर्जदाराने अर्जाच्या पृष्ठयार्थ प्रतिज्ञापत्र **(नि. ४३)** दाखल केलेले आहे. अर्जात नमुद केलेल्या कारणाने अर्ज दाखल करण्यास विलंब झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर विलंब माफ न केल्याने अर्जदाराचे अपरिमित नुकसान होईल. सबब मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज **(नि.४२)** खर्च रक्कम रुपये २००/– लादुन मंजूर करणेत येतो.

PRAJAKTA GAJANAN SHELAR
Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2024.08.07 17:48:46 +0530

स्थळ : कराड ( पी.जी.शेलार )

दिनांक :– ०७.०८.२०२४ ६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.